I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 28-32 e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)

A Double-Blind Peer Reviewed Journal OPEN ACCES Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES

© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# लोकशाहीप्रधान भारताची महिला सक्षमीकरणात भूमिका

रचना धर्मदास वानखडे

सि.एच.बी. राज्यशास्त्र विभाग

डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर.

Corresponding Author :rachanawankhade87@gmail.com

Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 | Published: 30.03.2022

**सारांश:**

महिला सशक्तीकरणाशी संबंधीत सामाजिक, आर्थिक, राजनीतीक आणि कायदेविषयक विषयांवर नेहमीच संवेदनशीलता आणि आदर व्यक्त केला जातो. सशक्तीकरणाच्या प्रक्रियेत समाजाला पारंपारिक पितृसत्ताक दृष्टिकोनाला महत्व दिल्या जाते. ज्यामुळे महिलांना नेहमीच कमजोर केल्या जाते. जागतिक स्तरावर महिलावादी आंदोलने आणि युएनडीपी आदी आंतरराष्ट्रीय संस्थांनी महिलांना सामाजिक सत्ता, स्वतंत्रता आणि न्याय यांच्यामध्ये राजकीय अधिकार प्राप्त करण्याची महत्वाची भूमिका निभवली आहे. महिला सशक्तीकरण भौतिक, आध्यात्मिक, शारिरीक आणि मानसिक या सगळया स्तरांवर महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याची प्रक्रिया आहे.

महिला सशक्तीकरणाला सोप्या शब्दात सांगायचे झाले तर महिला स्वत: शक्तीशाली बनतात आणि स्वत:चे निर्णय स्वत: घेऊ शकतात आणि परिवारात व समाजात चांगल्या प्रकारे राहू शकतात. समाजात त्यांना त्यांचे वास्तविक अधिकार प्राप्त करून देण्यासाठी त्यांना सक्षम बनविणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय. महिलांमध्ये इतकी ताकद असते की, समाज व देशाला बदलवू शकते आणि समाजातील कोणत्याही समस्येला पुरूषांपेक्षा चांगल्या प्रकारे सोडवू शकते.

महिलांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी भारत सरकारने खुप योजना अंमलात आणल्या आहे. महिलेने श्रमदानात योगदान केल्यास भारताचा विकास दर १० टक्के ने वाढू शकते असे विश्व बॅंक ने एका रिपोर्ट मध्ये मुद्दे मांडले होते.

**बीज संज्ञा:** महिला, सक्षमीकरण, कायदा, अडचणी, उपाय

**प्रस्तावना:**

महिला विकासातून राष्ट्रविकास साधण्याचे ध्येय अंगी बाळगून केंद्र व राज्य सरकार महिलांना सक्षम करत आहेत. महिला आज फक्त घर, मुलबाळ यातच रमून न जाता स्वावलंबी होऊन स्वत:चा व राष्ट्राचा विकास करत आहे. महिलांना भारतीय संविधानाने समान अधिकार दिलेले आहेत. शाश्वत विकास उद्दिष्टामध्येही महिला सक्षमीकरणावर भर देण्यात आला आहे. महिलासंदर्भात आज विवाहविषयक, स्त्रियांचे मालमत्ताविषयक व वारसा हक्कासंबंधीचे कायदे फौजदारी कायदे, कामगार स्त्रीयांचे अधिकार व हक्कासंबधीचे कायदे, दलित आणि मागासवर्गीय स्त्रियांसाठीचे कायदे, अपंग महिलांसाठीचे कायदे तसेच बऱ्याच मोठ्या प्रमाणावर महिला सक्षमीकरणात राष्ट्राने म्हणजेच केंद्र व राज्य सरकारने वेगवेगळया योजना सुध्दा अमंलात आणल्याचे दिसून येते.

या सगळया कायद्यामुळे तसेच महिला धोरणामुळे व वेगवेगळया योजनांमुळे आजची स्त्री असो की मुलगी खुप मोठ्या प्रमाणावर सुरक्षित झालेली आहे. या सुरक्षिततेच्या भावनेतुन ती तिचे काम चोखपणे पार पाडतांना दिसते. या सगळया अधिकारामुळेच स्त्री ही अनेक क्षेत्रात स्वत:चे व स्वत:च्या देशाचे प्रतिबिंब उमटवितांना दिसते. आज अंतराळ, आंतरराष्ट्रीय, खेळ, सामाजिक आर्थिक, राजकीय, क्रिडाविषयक सगळयाच क्षेत्रात अभिमानाने वावरतांना दिसते.

मिळालेल्या अधिकारामुळे महिलांना स्वत:च्या हक्काची जाणिव झालेली आहे व स्वत:वर स्त्री जातीवर झालेल्या अन्यायाविरोधात ती आवाज उठवितांना दिसते. महिलांना मिळालेल्या संवैधानिक अधिकार, वेगवेगळे कायदे तसेच योजना असुनही महिलांवरील आजही अन्याय, अत्याचार होतांना दिसून येते. रात्रीच्या वेळी आजही स्त्री सुरक्षित नाही म्हणून भारत देशात महिलांना मुक्तपणे संचार करण्यासाठी लोकांची, पुरूषांची मानसिकता बदलविणे खुप महत्वाचे आहे. तेव्हाच महिला सक्षमिकरण होवू शकेल.

**शोधनिबंधाचे उद्दिष्टे:**

अ. स्त्रियांच्या संवैधानिक अधिकाराची माहिती देणे.

ब. केंद्र–राज्यांनी महिला सक्षमीकरणात अंमलात आणलेल्या योजना.

क. आधुनिक काळातील महिलांसमोरील अडचणी व उपाययोजना

**अ. स्त्रियांच्या संवैधानिक अधिकाराची माहिती देणे:**

स्त्रियांना सक्षम करण्यात राष्ट्राची भूमिका खुप महत्वाची आहे. त्यासाठी तिला वेगवेगळे संवैधानिक संरक्षण देण्यात आले व वेगवेगळया कायद्याची निर्मिती करण्यात आली. त्याचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे.—

१. भारतीय संविधान हे देशाचा मूळ व सर्वोच्च कायदा आहे. त्यात महिलांसाठी वेगवेगळे नियम केलेले आहेत. स्त्रियांना समानता व समतेचा अधिकार कलम १४ मध्ये देण्यात आला आहे.

२. दुकाने, उपहारगृहे, सिनेमाघरे, तलाव, विहिरी, मंदिरे, स्नानघाट, रस्ते व इतर कोणत्याही ठिकाणी कोणत्याही स्त्रियांना लिंग, वर्ण—जाती भाषेच्या आधारावरर भेदभाव करून प्रवेश नाकारता येत नाही.

३. स्त्रियांना संपूर्ण विकासासाठी कायदे व तरतुदी करण्याचा शासनास विशेष अधिकार आहे.

४. सार्वजनिक सोई सवलती व सरकारी नोकऱ्यांमध्ये स्त्रियांसोबत लिंगाच्या आधारे भेदभाव करता येत नाही.

५. जीवन जगण्याचा अधिकार व व्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार पुरूषाप्रमाणेच स्त्रियांनासुध्दा कलम २१ ने दिला आहे.

६. धर्म, शिक्षण, व्यवसाय सर्व बाबतीत स्वातंत्र्य व समान संधी आणि समानतेचा अधिकार स्त्रियांना पुरूषाच्या बरोबरीने कलम १६ ने दिला आहे.

७. पुरूष व स्त्रियांना समान कामासाठी समान वेतन मिळावे. तसेच पुरूष व स्त्रियांचे आरोग्य, शारिरीक क्षमता आणि बालकांचे कोवळे वय या सर्व बाबींचा विचार करूनच त्यांना कामे देण्यात यावी अशीही तरतूद आहे.

८. समान नागरी संहिता व कामगार स्त्रियांना मातृत्व लाभ प्राप्त करून देण्यासाठी शासनाने कायदेशीर तरतुदी कराव्यात. स्त्रियांना वेठबिगार बनविणे, त्यांच्या देहव्यापार करणे या गोष्टीस प्रतिबंध आहे.

९. स्त्रियांना सन्मानपूर्वक वागणुक द्यावी व त्यांच्यावर अत्याचार होणाऱ्या प्रथांचा बिमोड करावा.

१०. पंचायतराज व नगरपालिकेच्या निवडणूकीत सर्व प्रवर्गातील स्त्रियांसाठी ७३ व ७४ व्या घटनादुरूस्तीने ३३ टक्के राखीव जागा ठेवणे. तसेच २००९ पासून ५० टक्के जागा राखीव ठेवणे अनिवार्य आहे.

या संवैधानिक अधिकारातुनच वेगवेगळे स्त्री विषयक कायदे राष्ट्राने केल्याचे दिसून येते. ते सर्व कायदे थोडक्यात पुढील प्रमाणे:—

१. विवाहविषयक कायदे
२. स्त्रियांचे मालमत्ता व वारसा हक्कासंबंधीचे कायदे.
३. फौजदारी कायदे
४. कामगार स्त्रियांचे अधिकार व हक्कासंबंधीचे कायदे.
५. दलित आणि मागासवर्गीय स्त्रियांसाठीचे कायदे.

वरील कायद्याने महिलांना अधिक सक्षम केले असून त्याची विस्तृत माहिती पुढील प्रमाणे;—

**१. विवाहासंबंधीचे कायदे:**

यामध्ये स्त्रियांना विवाहविषयक समस्या उद्भवल्यास वेगवेगळया कायद्याद्वारे स्वत:चा हक्क मागता येतो व अन्यायाविरोधात आवाज उठविता येतो.

१. हिंदू विवाहविषय कायदा : १८५५
२. हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा: १८५६
३. आनंद विवाह कायदा : १९०९
४. आर्य विवाह विधीवत कायदा : १९३७
५. मुस्लीम विवाह कायदा
६. मुस्लीम स्त्री (घटस्फोट हक्क संरक्षण) कायदा : १९८६
७. भारतीय ख्रिस्ती विवाह विषयक कायदा : १८७२
८. पारसी विवाह व घटस्फोट कायदा : १९३६
९. विशेष विवाह कायदा : १९५४
१०. धर्मांतरित व्यक्ती विवाह विच्छेद कायदा : १८६६
११. भारतीय घटस्फोट कायदा : १८६९
१२. हिंदु दत्तक व निर्वाह कायदा : १९५६

**२. स्त्रियांचे मालमत्ता व वारसा हक्कासंबंधीचे कायदे:**

महिलांना आज प्रत्येक क्षेत्रात तिचे अधिकार संविधानाने मिळाले आहेत. ती आज स्वत:च्या वडिलांच्या मालमत्तेचा तसेच वारसा हक्काने मिळालेल्या संपत्तीत स्वत:चा हक्क मागु शकते. हा अधिकार तिला मिळाला असून स्वत:च अस्तित्व निर्माण करण्यासाठी व संविधानिक समानतेच्या अधिकारासाठी उपयुक्त आहेत.

१. हिंदू उत्तराधिकारी कायदा : १९५६
२. विवाहीत स्त्रियांच्या संपत्तीचा कायदा : १९५९
३. मुस्लीम स्त्रियांच्या मालमत्ता व वारसा हक्कांचा कायदा
४. ख्रिश्चन स्त्रीचे मालमत्ता व वारसा हक्क
५. पारसी स्त्रीचे मालमत्ता व वारसा हक्क

**३. फौजदारी कायदे:**

स्त्री आज फौजदारी कायद्याद्वारे अधिकच मजबूत झाली आहे. तिला विविध फौजदारी अधिकार, फौजदारी कायद्याद्वारे मिळाले आहेत ते पुढीलप्रमाणे:—

**१. भारतीय दंडविधान कायद्यातील स्त्रियांसंबधीत महत्वाची कलमे—**

अ. गर्भस्त्राव व गर्भपात करणे व भ्रुणहत्या यासाठी शिक्षा.
ब. छेडछाड व बळजबरी करणे यासाठी शिक्षा.
क. लैगिंक अपराध बलात्कारास शिक्षा.
ड. विवाहासंबधीचे अपराध.
इ. भारतीय फौजदारी संहिता प्रक्रिया कायद्यातील महत्वाचे नियम.
२. स्त्रियांचे अश्लिल प्रदर्शन प्रतिबंध कायदा : १९८६
३. अनैतिक देह व्यापार प्रतिबंध कायदा : १९५६
४. वैद्यकिय गर्भपात कायदा : १९७१
५. बालविवाह निर्बंध कायदा : १९२९
६. कौंटुबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा : २००५
७. गर्भलिंग चाचणी प्रतिबंध कायदा : १९९४
८. सती प्रथा प्रतिबंध कायदा : १९८७
९. हुंडा प्रतिबंध कायदा : १९६१
१०. महाराष्ट्र देवदासी प्रथा प्रतिबंध व निर्मूलन कायदा : २००५

**४. कामगार स्त्रियांचे अधिकार व हक्कासंबंधीचे कायदे:**

आजची स्त्री सगळया क्षेत्रात निपूण आहे. प्रत्येक क्षेत्रात वावरत असतांना कामगार स्त्रियांना भेळसावणाऱ्या समस्यासाठी वेगवेगळे कायदे राष्ट्रांनी अमंलात आणले त्याचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे:—

१. मातृत्व लाभासंबधीचा कायदा : १९६१
२. कारखाने कायदा : १९४८
३. खाण कायदा : १९५२
४. करार मजूर (नियोजन व निर्मूलन) कायदा : १९७०
५. किमान वेतन कायदा : १९४८
६. शेती—मळा लागवड कामगार कायदा : १९५१
७. वेठबिगारी प्रथा (प्रतिबंध) कायदा : १९७६
८. कामगारासाठी नुकसान भरपाई कायदा : १९२३
९. वेतन प्रदान कायदा : १९३६
१०. राज्य कामगार विमा कायदा : १९४८
११. चित्रपट व नाट्य कामगार (नोकरी नियमन) कायदा : १९८१
१२. आंतरराज्यीय स्थलांतरित कामगार (नोकरीच्या अटी व नोकरी नियमन) कायदा : १९७९
१३. समान वेतन कायदा : १९७६
१४. बालकामगार (प्रतिबंध व नियमन) कायदा : १९८६
१५. स्त्रियांच्या लैंगिक छळ प्रतिबंधासंबधीचे नियम.

५. दलित आणि मागासर्वीय स्त्रियांसाठीचे कायदे:

ज्यावेळेला दलित व मागासर्वीयांचा उल्लेख होतो त्यावेळेला त्यांच्यावर आजही होणाऱ्या अन्यायाची चाहुल लागते. या दलित स्त्रियावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी खुप कमी प्रमाणात कायदे आहेत.

१. नागरी अधिकारांच्या संरक्षणासंदर्भातील कायदा : १९५५
२. अनुसूचित जाती व जमाती (एस.सी ॲन्ड एस.टी.) अत्याचार प्रतिबंधक कायदा : १९८९

वरील सर्व कायद्याने महिलांना सक्षम पाठबळ मिळाले असून महिला सक्षमीकरणात हे कायदे मैलाचा दगड ठरले आहेत.

**ब. केंद्र—राज्यांनी महिला सक्षमीकरणात अंमलात आणलेल्या योजना:**

महिलासक्षमीकरणा संदर्भात केंद्र व राज्यांनी आपआपल्या स्तरावर वेगवेगळया योजना अंमलात आणल्या त्यांच्या थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे—

१. विरभद्रकाली ताराराणी स्वयंसिध्दा योजना : नोव्हेंबर २०२१
२. मिशन वात्सल्य : २५ ऑगस्ट २०२१
३. अस्मिता योजना (राज्यशासन) : ८ मार्च २०१८ जागतिक महिलादिनी
४. उद्यम सखी पोर्टल : ८ मार्च २०१८ नवउद्योजक महिलांना सक्षम, स्वयंपूर्ण आणि आत्मनिर्भर बनविण्यासाठी.
५. नवीन एकात्मिक शालेय शिक्षण योजना : १ एप्रिल २०१८ साली 'सबको शिक्षा, अच्छी शिक्षा' हे उद्दिष्ट ठेवून.
६. कन्या वनसमृध्दी योजना (राज्यशासन) : २७ जुन २०१८ महिला सक्षमीकरण आणि सबलिकरणाचा संदेश देवून मुलीच्या घटत्या संख्येवर काही प्रमाणात नियंत्रण मिळविण्यासाठी.
७. पंतप्रधान मातृत्व वंदना योजना (केंद्र शासन) : १ जाने २०१७ गर्भधारणेतील बुडणारा रोजगार, आर्थिक नुकसान भरून काढणे.
८. जननी शिशु सुरक्षा योजना : १ जानेवारी २०१७
९. प्रधानमंत्री महिला शक्ती केंद्र योजना : जानेवारी २०१७ महिलांचे सबलीकरण घडवून आणण्यासाठी.
१०. माझी कन्या भाग्यश्री (महाराष्ट्र शासन) : ८ ऑगस्ट २०१६
११. पंतप्रधान उज्वला योजना : १ मे २०१६ महिलांना स्वच्छ इंधन चांगले जीवन देण्यासाठी.
१२. प्रधानमंत्री मातृत्व अभियान : ३१ जुलै २०१६
१३. सुकन्या योजना (केंद्र शासन) : २२ जानेवारी २०१५
१४. माझी कन्या भाग्यश्री योजना : ८ मार्च २०१५
१५. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना (आदिवासी मातांसाठी).

१६. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले 'लेक शिकवा' अभियान : २०१४ (सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त)
१७. मनोधैर्य योजना (राज्य शासन) : २ ऑक्टोबर २०१३ अॅसिड हल्ल्याविरोधात.
१८. नई रोशनी (अल्पसंख्याक) भारत सरकार : २०१२ – २०१३ अल्पसंख्याक महिलांसाठी
१९. महिला शेतकरी सबलीकरण योजना : १ जानेवारी २०११ ग्रामीण भागातील महिलांचा आर्थिक, सामाजिक विकास घडवून आणणे.
२०. एकात्मिक बालविकास प्रकल्प (फक्त आदिवासी महिलांसाठी) (केंद्र सरकार) : १ एप्रिल २०११
२१. इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना : ४ जुलै २०११
२२. सुकन्या योजना : २०११ मुलींमधील जन्मदर व मृत्यूदर यामधील तफावत दूर करणे.
२३. राजीव गांधी कुमारी अधिकार योजना (केंद्र सरकार) : १९ नोव्हेंबर २०१० किशोरवयीन मुलींसाठी.
२४. पंचायत राजमधील महिला संदस्यांना साक्षर योजना (केंद्र सरकार) : १९ नोव्हेंबर २०१०
२५. आशा योजना (राज्यशासन) : २००९ आदिवासी महिलांचे आरोग्य व समस्या निवारणासाठी
२६. कन्यादान योजना (राज्यशासन) : १८ डिसेंबर २००८ विवाह सोहळयामध्ये अनाठायी होणाऱ्या खर्चाला आळा घालणे.
२७. मुख्यमंत्री कन्या विवाह योजना : १६ फेब्रुवारी २००८ अतिशय गरिब कुटूंबातील मुलींच्या लग्नासाठी मुख्यमंत्री निधीतून अर्थसाहाय्य पुरविणे.
२८. जिजामाता महिला आधार योजना (राज्यशासन) : १ मे १९१९
२९. आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य योजना : ७ मे १९९९
३०. भाग्यश्री बालकल्याण योजना : १९ ऑक्टोबर १९९८
३१. कस्तुरबा गांधी शिक्षण योजना (केंद्र सरकार) : १५ ऑगस्ट १९९७ स्त्रियांचा साक्षरता दर वाढविणे.
३२. देवदासी विवाह अनुदान योजना : १९९७
३३. मातोश्री वृध्दाश्रम योजना : ७ नोव्हेंबर १९९५
३४. सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना (केंद्र) : १९९५ लिंग गुणोत्तर समान राखणे.
३५. अपनी बेटी अपना धन योजना (हरियाणा सरकार) : २ ऑक्टोबर १९९४
३६. राष्ट्रीय महिला कोष (केंद्र सरकार)
३७. महिला समृध्दी योजना (केंद्र सरकार) : २ ऑक्टोबर १९९३ महिलांना बचतीची सवय लावणे.
३८. हुंडाग्रस्त महिलांना पुनर्वसनाची माहेर योजना : १९८७
३९. देवदासी पुनर्वसन योजना : १९८६–८७
४०. सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना : १९८३–८४
४१. मुलींना मोफत शिक्षण योजना : १९८३–८४
४२. २० कलमी कार्यक्रम : जून १९७५

**क. आधुनिक काळातील महिलासमोरील अडचणी व उपाययोजना:**

अनेक कायदे किंवा संवैधानिक अधिकार मिळूनही महिला बऱ्याच उपेक्षित आहे. ग्रामीण भागातील महिलांना अद्याप त्यांच्यासाठी असलेल्या कायद्याची माहिती नसल्याने व त्या अशिक्षित असल्याने, पाहिजे त्या प्रमाणात त्या सक्षम होवू शकल्या नाहीत. त्यामुळे त्यांना बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

१. रात्रीच्या वेळी स्त्री सुरक्षितता ही खुप मोठी अडचण आहे. एकटी महिला बघुन तिच्यावर अन्याय होतांना दिसतात.
२. महिलांवर मोठ्या प्रमाणावर ग्रामीण, शहरी दोन्ही ठिकाणी हुंडाबळी, मानसिक छळ, शारिरीक छळ यामुळे महिला कमकुवत बनली आहे.
३. स्त्रीयांना कंपनी,? ऑफीस तसेच वेगवेगळया क्षेत्रात वरिष्ठाकडून तसेच आप्तीयाकडून मिळणारी हिनत्वाची वागणूक हे तिच्या सक्षमीकरणापुढील खुप मोठे आव्हान आहे.
४. स्त्रीला आर्थिक, राजकीयदृष्टया, सामाजिकदृष्टया सक्षम करण्यात लोकशाही प्रधान भारत कुठे तरी कमी पडतांना दिसतो.
५. स्वातंत्र्योत्तर कालखंडापासून महिलांचा राजकीय वाटा पाहिजे त्या प्रमाणात वाढला नाही याला कारण म्हणजे महिलांची राजकारणाप्रती असलेली उदासिनता होय.
६. बाहेरच्या जगाबरोबरच घरातच तिला तिच्या हक्कासाठी लढाव लागतय ही खुप मोठी समस्या आहे.
७. मुलगी होवू नये या मानसिकतेमधून भ्रुण हत्या प्रमाण वाढत आहे. यामुळे लिंग गुणोत्तर प्रमाणात खुप मोठी तफावत बघायला मिळते.

**उपाययोजना:**

संशोधिकेला वरिल अभ्यासातून काही उपाययोजना सुचवू पहात आहे जसे की;–

१. महिलांना सगळया संवैधानिक कायद्याची व स्त्रिसाठी असलेल्या योजनाची बालपणापासूनच संपूर्ण माहिती मिळविण्यासाठी व्यवस्था केंद्र व राज्याने करायला हवी.

२. प्रवासादरम्यान तिच्यावर अन्याय—अत्याचार होवू नये यासाठी ठोस पावले उचलायला हवे.

३. महिलांना सक्षम करतांना ग्रामीण महिलांवर अन्याय होणार नाही याची काळजी घ्यायला हवी.

४. महिला सक्षमीकरणात राष्ट्राने केलेल्या उपाययोजना त्यांच्या पर्यंत पोहोचण्यासाठी सक्षम यंत्रणा उभी करायला हवी.

५. दलित व मागासवर्गीय महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी व त्यांना त्यांच्या हक्काविषयी जागृत करण्यासाठी वेगवेगळया सामाजिक संस्थांनी पुढाकार घ्यायला हवा.

६. महिलांना सक्षम करण्यासाठी अभ्यासक्रमात त्यासाठी व्यवस्था करण्यात यावी.

**संदर्भ :**

डॉ. राजकुमार —महिला एवं विकास, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, प्रथम संस्करण, २००३

श्री. चंद्रसेन तुरकर व श्री. शशिकांत वायदंडे — महिला: कायदे व अधिकार, यशदा, पुणे, २००८

प्रा. संजय खंडारे व प्रा. शैला थोखे — पंचायत संस्था आणि विकासाच्या योजना, अनुज पब्लिकेशन, औरंगाबाद, २००८

शारदा साठे — स्त्री मुक्ती संघटनेचे नियतकालिक, शारदा साठे, विश्वस्त स्त्री मुक्ती संघटना, सप्टेंबर २०२१

श्री. रंजन कोळंबे — भारताची राज्यघटना आणि प्रशासन, भगीरथ प्रकाशन, पुणे, २०१९